सामना
संपादक : बाळ ठाकरे

Date: 10 February 2010
Edition: Pune
Page No.: 10

# 'आयपीएल'चे सामने आता मल्टिप्लेक्सवर

**पुणे** : जगातील सर्वात मोठे डिजिटल सॅटेलाईट सिनेमा नेटवर्क असलेल्या 'यूएफओ मूव्हीज'तर्फे येत्या १२ मार्चपासून सुरू होत असलेल्या इंडियन प्रीमिअर लीगच्या (आयपीएल) तिसऱ्या मोसमाचा थरार आणखी वृद्धिंगत करण्यासाठी स्पर्धेतील सर्व सामने देशभरातील मल्टिप्लेक्स थिएटर, तसेच एकच पडदा असलेल्या चित्रपटगृहांतही हाय डेफिनिशन डिजिटल फॉरमॅटमध्ये दाखविण्यात येणार आहेत. पुण्यातील क्रिकेटप्रेमी ऑयनॉक्स, फेम फन एन शॉपसह विजय सिनेमा मंदिर व हडपसरमधील वैभव चित्रमंदिर या एकेरी पडद्याच्या सिनेमागृहामध्ये आयपीएल- ३चा थरार अनुभवू शकतील. पिंपरीमधील अशोक चित्रमंदिर व फेम जय गणेश थिएटरमध्येही या स्पर्धांचे प्रक्षेपण होणार आहे. सामन्यादरम्यान कुठल्याही जाहिरातीचे प्रसारण होणार नाही, हे विशेष.

यासंदर्भात पत्रकार परिषदेत माहिती देताना 'यूएफओ मूव्हीज इंडिया लिमिटेड'चे मुख्य कामकाज अधिकारी पंकज जयसिंह म्हणाले, 'आयपीएल'ची जादू टिकवून ठेवण्यासाठी चित्रपटगृहांमध्येही खास महोत्सव भरवून क्रिकेट स्टेडियमसारखे वातावरण निर्माण केले जाणार आहे. तब्बल ४५ दिवस चालणारी ही स्पर्धा देशभरातील एक हजारहून अधिक स्क्रीन्सवर दाखविण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. चित्रपटगृहात संपूर्ण कुटुंबाच्या आवडीची क्रिकेटशी संबंधित विक्री उत्पादने, आकर्षक भेटवस्तू व वैविध्यपूर्ण खाद्यपदार्थांचे स्टॉल्स असतील. या उपक्रमात अधिक रंग भरण्यासाठी अनेक चित्रपटगृहांत चीअर लीडर्स व वाद्यवृंदही सज्ज असणार आहे. आतापर्यंत 'यूएफओ मूव्हीज'ने देशभरातील ५५० चित्रपटगृहांशी करार केले आहेत. त्यामध्ये दोनशे मल्टिप्लेक्स थिएटरचा समावेश आहे. महाराष्ट्र व गोवा विभागात याआधीच १३२ चित्रपटगृहांशी करार झाले आहेत, अशी माहितीही त्यांनी दिली.